**७२ वा दीक्षांत समारोह**

**वतृ अहवाल**

मुंबई
१५ फेब्रुवारी, २०२३

एस.एन.डी.टी. महिला विदयापीठाचा ७२ वा दीक्षांत समारोह दिनांक १५ फेब्रवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृह, चर्चगेट येथे साजरा झाला. महान समाज सुधारक भारतरत्न महर्षी धोंडो केषव कर्वे यांनी १९१६ मध्ये स्थापन केलेल्या एस.एन.डी.टी. महिला विदयापीठाचे शिक्षणाद्वारे महिलांचे सक्षमीकरण हे ध्येय आणि "ज्ञानी स्त्री ही एक असीम शक्ती स्रोत आहे" हे बोधवाक्य भारतातील स्त्री शिक्षणाशी समानार्थी आहे.

या दीक्षांत समारोहात डॉ. संजय शेडमाके (संचालक, परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ ) यांनी बक्षिसे घोषित केली. यामध्ये एकूण १२८०१ स्वायत्त महाविदयालय सहित विदयार्थिनीना पदवी/पदवीका प्रदान करण्यात आल्या. यात स्नातक पदवीचे बॅचलर डिग्रीचे (१०५२५) प्रमाण सर्वाधिक सर्वाधिक होते, स्नातकोत्तर (१७७२) स्नातकोत्तर पदविका (९७) पदवीधर, डिप्लोमा (४०२) प्रमाणपत्र (०५) आणि ५३ पीएच.डी विद्यार्थीनी पदव्या प्रदान करण्यात आल्या..एकूण ७२ सुवर्णपदके, १ रौप्यपदके, १ ट्रॉफी व १३४ रोख बक्षिसे देण्यात आली. यात २१७ पदवी आणि पदविका चार विदयाशाखांच्या अंतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान आणि अंतःविशयक अभ्यासक्रम प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. अंबादासजी जोशी (निवृत्त न्यायाधीश), लोकायुक्त, गोवा राज्य यांनी विद्यावाचस्पती पदवी प्राप्त विदुशींचे अभिनंदन केले तसेच शैक्षणिक खंड असताना देखील इतर कौटुंबिक जबाबदाऱ्या सक्षमपणे सांभाळत देखील अध्ययन सुरू ठेवल्याबद्दल अभिनंदन केले. पदवीधर विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीचे महत्व पटवून देत असताना तरुण पिढीला कुटुंबात वाचन संस्कृती रुजवण्याची गरजही त्यांनी प्रतिपादित केली. शालेय जीवनातील शिक्षकांची उदाहरणे देऊन व्यक्तिमत्व विकासात शिक्षकांचे असलेले महत्व अधोरेखित करताना केले. शिक्षणात आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन आणि टीकात्मक विचारांच्या गरजेचे त्यांनी समर्थन केले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाच्या पदवीधरांचे अभिनंदन करत महर्षी कर्वे यांच्या विचारांचा जतन करून त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात महर्षी कर्वे यांच्या विचारांचा अंगीकार केला पाहिजे असे मत व्यक्त केले.

डॉ. संजय शेडमाके, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी परितोषिक प्राप्त गुणवंत विद्यार्थिच्या नावाची उद्घघोषणा केली. व्यासपीठावर उपस्थित प्रमुख अतिथी श्री. अंबादासजी जोशी, मा. कुलगुरू, प्रा. उज्वला चक्रदेव, प्र- कुलगुरू, प्रा. रुबी ओझा, कुलसचिव, प्रा. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी, श्री.विकास देसाई आणि विद्यापीठाच्या अधिष्ठाता यांच्या हस्ते गुणवंत विद्यर्थिनींना सन्मानित करण्यात आले.

कुलसचिव, प्रा. विलास नांदवडेकर यांनी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता केली.